जा.क्र.गुन्हे शाखा/ ४२२६ /२०१८ दिनांक ०१/११/२०१८

# परिपत्रक

विषय- कृत्रिमरित्या प्लॅस्टीकपासुन बनविलेल्या नायलॉन मांज्यामुळे पक्षी व मानव जिवितास इजा होणेबाबत पर्यावरण (संरक्षण कायदा १९८६ च्या) कलम ५ अन्वये निर्देश.

संदर्भ- १) पोमसं /२४/५२५२/पाव.अधि.२०१६/प्रलंबित आश्वा क्र २५१/१९७/२०१६ दि.ऑक्टो २०१६
२) महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग यांचे निर्देश क्र.सि.आर.टि.२०१५/प्रक्र३७/ता.क.२ दि. १८/०६/२०१६

oooo

उपरोक्त संदर्भिय परिपत्रक व निर्देशान्वये नायलॉन मांज्याच्या वापरामुळे होणा-या जिवित हाणीस टाळण्याकरिता महाराष्ट्र शासनाने खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१) प्लॅस्टीक किंवा इतर कृत्रिम वस्तुंपासुन बनविलेले " नायलॉन मांज्याच्या " नावाने परिचीत असलेल्या पक्कया धाग्याचा वापर पतंग उडविण्याच्या सणाच्या वेळी करण्यात येतो.त्यामुळे पक्षांना व मानवी जिवीतास तिव्र इजा होण्याचा धोका असतो अशा धाग्याच्या वापरावर बंदी घालण्यात यावी.

२) घाउक व्यापारी ,किरकोळ व्यापारी तसेच साठवणुकदार यांनी तत्परतेने नायलॉन मांज्याची विक्री, साठवणुक थांबावी,त्यायोगे संपुर्ण वर्षभरात त्याची साठवणुक हाताळणी व विक्री होणार नाही.

३) पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणा-या अशा अविघटनशील नायलॉन मांज्यामुळे गुरांना उदभविणारा धोका, माती व पाण्याच्या गुणवत्तेची पातळी घसरणे तसेच एकंदरित परीस्थीतीत प्राणी जातीला उद्भवणा-या इसांना प्रतिबंध करण्यात यावा.

४) पतंग उडवितांना केलेल्या मांज्याच्या वापरामुळे विजेच्या तारांवर घर्षण होवुन आग लागने उपकेंद्रे बंद पडणे,विज उपकरणे बिघडणे अपघात घडणे इजा व जिवित हाणी होणे याबाबतची जनजागृती करण्यात यावी.

आपआपल्या कार्यक्षेत्रात सदर निर्देशाची तत्परतेने अंमलबजावणी करण्यात यावी.यात हयगय होता कामा नये.

(संजयकुमार बाविस्कर)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

Scanned by CamScanner